## ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ
## द्वारा संचालित
# डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

डॉ. खत्री महाविद्यालयात सायबर सुरक्षा आणि वेळेचे व्यवस्थापन कार्यक्रम :स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय तुकुम चंद्रपूर येथे दिनांक 29 जानेवारी 2024 रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात महिला सुरक्षा समिती अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने सायबर सुरक्षा आणि वेळेचे व्यवस्थापन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर होते तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या कोषाध्यक्ष प्रा. अनुश्री पाराशर मॅडम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती शिवाय सायबर सुरक्षा यावर मार्गदर्शन करणारे माननीय श्री. मुजावर अली सर, श्री. रोशन इरपाचे सर पोलीस उपनिरीक्षक, वेळेचे व्यवस्थापन यावर मार्गदर्शन करण्याकरिता लाभलेल्या सौ ममता बजाज, सौ. शितल खत्री ,सौ. खुशबू चांडक, श्री. गौरव लोहाटी, तसेच सौ. गौरी लोढा, श्री. रुपेश राठी, सौ. रोझी सलुजा इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते .श्री. मुजावर अली आणि श्री. रोशन इरपाचे सर यांनी सायबर सुरक्षा या अनुषंगाने वेगवेगळे उदाहरणे देऊन मौलिक असे मार्गदर्शन केले तसेच जे. सी. आय. चंद्रपूर गरिमा व इलाईट तर्फे वेळेचे व्यवस्थापन या विषयावर सौ. ममता बजाज यांनी मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ. सुवर्णा राऊत मॅडम यांनी केले तसेच मान्यवराचे आभार प्रा. रोहिणी रोहनकर यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. तीन तासाच्या या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
STUDENT AWARENESS PROGRAMME
JCI – CHANDRAPUR
JCI CHANDRAPUR GARIMA


डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
STUDENT AWARENESS PROGRAMME
JCI CHANDRAPUR GARIMA

